दिशादर्शक, मार्गदर्शक!

दिवा न्यूज

▶ वर्ष–३
■ अंक–३१

# प्रशासनाकडून दिव्याला गृहीत धरले जातेय का?
# सात वर्षे झाली...दिवा पूर्व-पश्चिम पूल होणार कधी?



**दिव्यातील समस्या समजून घेतील आणि वरिष्ठांना त्या सांगतील असे कर्तव्यदक्ष अधिकारी दिव्याला हवेत...**

**फक्त हजेरी लावून दिवस भरणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिवा शहराच्या नियोजनबद्ध विकासाला खीळ घातली आहे...**

विशेष संपादकीय — सुहास खंडागळे

**दिवा :** अलीकडे दिवा न्यूज सोबत बोलताना जागा हो दिवेकर संघटनेचे अध्यक्ष विजय भोईर म्हणाले,दिवा पूर्व पश्चिम ब्रिजचे काम रखडणे हे दिव्याला गृहीत धरण्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. खरच प्रशासनाकडून दिवा शहराला गृहीत धरले जातेय का?याबाबत या शहराचे सुजाण नागरिक असणाऱ्यांना विचार करावा लागेल.

शिवसेना एकसंध असताना दिवा पूर्व पश्चिम पुलाच्या कामाचे भूमिपूजन आदित्य ठाकरे यांच्या हस्ते वाजत गाजत झाले. मागील सात वर्षांच्या काळात धीम्या गतीने काम सुरू राहीले. या सात वर्षात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. शिवसेना विभागली.ठाणे जिल्ह्यात वर्चस्व असणारे आज राज्याचे प्रमुख झाले.मुख्यमंत्र्यांनी मागील दोन वर्षात दिव्याला विकासाचा भरघोस निधी दिला, अनेक विकासकामे सुरू झाली.मात्र दुसरीकडे दिवा पूर्व पश्चिम ब्रिजचा प्रश्न आहे तिथेच आहे. रेल्वेने त्यांच्या हद्दीत काम पूर्ण करून घेतले आणि हात वर केले. आता पालिका हद्दीतील काम बाकी आहे. या कामात काही अडचणी असतील तर त्या पालिका प्रशासनाने प्राधान्याने सोडवायला हव्यात. प्रश्न तसाच पडून राहण्यापेक्षा त्यावर उत्तर शोधायला हवे. जेव्हा ब्रिजचा आराखडा बनवला गेला तेव्हा संभाव्य अडचणींचा अंदाज पालिका प्रशासनाला कसा आला नाही हाही प्रश्नच आहे. नियोजन होते तर ब्रिज रखडला का?आणि संपूर्ण नियोजन नव्हते तर तुम्ही दिवा शहरातील नागरिकांना गृहीत धरता असा आरोप होऊ लागला तर त्यात गैर काय?

मागील सात वर्षात स्थिती बदलली आहे. दिवा पश्चिम ेला मोठ्या प्रमाणात नागरिकीकरण वाढले आहे. वाढत्या नागरिकीकरणाच्या तुलनेत सुविधा उपलब्ध करून देणे पालिका प्रशासनाचे काम आहे. दळणवळणच्या दृष्टीने दिवा पूर्व पश्चिम रस्ता होणे आवश्यक आहे. त्या पलीकडे जाऊन दिवा पश्चिम ते रेतीबंदर असा रस्ता निर्माण करून दिवा शहर ठाणे शहराला जोडता आले तर या शहराचा विकास झपाट्याने होण्यास मदत होईल. खरं तर भविष्याचा विचार करून विकासाचे नियोजन असायला हवे. दिवा पुर्व पश्चिम पूल हे २०१७ चे नियोजन होते. आज २०२४ आहे. महत्त्वाचे प्रकल्प असे विलंबाने होऊ लागले तर त्याचा परिणाम एकूण विकासावर होतो. जी स्थिती दिवा पूर्व पश्चिम पुलाची तीच काहीशी पाणी योजनेची आहे. पाईपलाईन पडल्या आहेत. निधीही पडला आहे, मात्र सामान्य नागरिकांना पाणी काही पोहचत नाही. याचे कारण अंतर्गत जलवाहिन्या नसणे हे आहे. अनेक नागरिकांची तर अशी अवस्था आहे की पालिकेच्या नळाला पाणीच येत नाही...अशा स्थितीत अनधिकृत नळ जोडण्या आणि टँकरने पाणीपुरवठा यावरच नागरिकांना अवलंबून रहावे लागते.नवीन पाणी योजना अस्तित्वात येतेय खरी पण पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्याने इथेही नागरिकांना गृहित धरले जातेय का?याचा विचार व्हायला हवा. मागील अनेक वर्षात दिव्यातील पाणी समस्येवर तोडगा काढण्यात पालिका प्रशासन अपयशी ठरत असेल तर याचा अर्थ काय घ्यायचा?एकतर येथील समस्या समजून घेण्यात पालिका प्रशासनाला रस नसावा किंवा जे चालले आहे तसेच सुरू रहावे अशी मानसिकता प्रशासनाची असावी.प्रश्न सोडविण्याची मानसिकता असणारे कर्तव्य दक्ष अधिकारी मुख्यमंत्री महोदयांनी दिव्याला द्यायला हवेत.ज्या दिव्यात भीषण पाणीटंचाई आहे तिथे लाख ते दीड लाख रुपये अनधिकृत नळ जोडणीसाठी घेण्याचा धंदा चालत असेल तर असा धंदा चालवणाऱ्याना प्रश्न सुटावा असं का वाटेल?टँकरने मुबलक पाणी पुरवठा होतो मात्र नळाला पाणी नाही अशी स्थिती आहे.सोन्याचे अंडे देणारी कोंबडी म्हणून दिव्याकडे पाहिले जाणार असेल तर येथील समस्या कशा सुटतील?

दिव्यात चालण्यासाठी रस्त्यांना फुटपाथ नाहीत. अरुंद रस्ते आहेत. मात्र तरीही दुतर्फा फेरीवाले बसले आहेत... शहराला जी शिस्त अधिकाऱ्यांनी लावायला हवी ते त्यांच्या कर्तव्यात चुकत असतील तर अख्या शहराचे फेरीवाला मार्केट होऊ शकते याचे उदाहरण दिव्यात पहायला मिळते.रस्त्याने चालायला जागा नसल्याने जनता रस्त्याच्या मधून चालत जाते,यातून अपघात होण्याची शक्यता असते... मात्र असे असले तरी रस्ते मोकळे करण्याची मानसिकता प्रशासनात नाही. दिव्यातील जनतेला गृहीत धरण्याचे हे आणखी एक उदाहरण म्हणावे लागेल. अशी अनेक उदाहरणे देता येतील. दिवा शहरात सामान्य माणसाला कसे गृहीत धरले जाते यावर एक मालिका चालेल. परवाच एक महिला गटाराच्या उघड्या झाकणात पाय गेल्याने गंभीर जखमी झाली. स्मार्ट सिटीची टिमकी वाजवणाऱ्या ठाणे महापालिकेला गटारांची झाकणे लावण्यासाठी निधी मिळत नाही की दिव्यात गटारांना झाकण बसविणे प्रशासनाला गरजेचे वाटत नाही?अशा पध्दतीने दिवा शहरात प्रशासन काम करत असेल तर प्रशासनाचे प्रमुख म्हणून पालिका आयुक्तांनी कर्तव्यदक्ष अधिकारी शहरात बसवायला हवा. फक्त हजेरी लावून दिवस भरणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिवा शहराच्या नियोजनबद्ध विकासाला खीळ घातली आहे. असे अधिकारी जो पर्यंत दिव्यात आहेत येथील जनतेला न्याय मिळणे अवघड आहे. शहरातील समस्या वरिष्ठांना सांगणे येथील स्थानिक प्रशासनाचे काम आहे. अडचणी सोडविण्याची धडपड प्रशासनात दिसायला हवी. मागील दोन वर्षे सर्व कारभार प्रशासनाच्या हातात आहे. दिव्यातील लोकांना लोकाभिमुख प्रशासनाचा अनुभव मात्र पहायला मिळत नाही हे वास्तव आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. ४ मार्च २०२४
पान : २

# खासदारांनी दिवावासीयांच्या मताचा बाजारच केला




## पाणी टंचाईवरून ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेत्या ज्योतीताई ठाकरे यांचा हल्लाबोल



## शहर संघटीका ज्योती पाटील आयोजित महिला मेळाव्याला महिलांची गर्दी

दिवा:-शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करायचे असतील तर दिवा शहरातून एक एक ज्योत पेटवून ही मशाल तेवत ठेवली पाहिजे असे सांगताना येथील खासदार व आमदारांनी दिवा वासियांच्या मतांचा केवळ बाजारच केला, सुविधा मात्र येथील नागरिकांना दिल्या नाहीत असा घणाघात ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेत्या ज्योतीताई ठाकरे यांनी दिवा येथे आयोजित महिला मेळाव्यात केला.

ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी तन्वी फाउंडेशन व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शहरातील आकांक्षा हॉल येथे महिला मेळाव्याचे आयोजन केले होते.या मेळाव्याला मार्गदर्शन करताना ज्योतीताई ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांचा खरपूस समाचार घेतला. दिवा शहरातील महिलांना सर्वाधिक समस्यांना सामोरे जावे लागत असून येथे प्रसूतीगृह किंवा रुग्णालय नाही.त्याचबरोबर येथील महिलांना पाणीटंचाईचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागतो.दिवा शहरासाठी अग्निशमन केंद्र शहरात अस्तित्वात नाही. एकीकडे २२१ कोटीची पाणी योजना राबवली गेली मात्र दिव्यातील म हिलांच्या घरात मुबलक पाणी मिळाले का? असा सवाल ही त्यांनी आपल्या भाषणादरम्यान केला. यावेळी त्यांनी खासदार श्रीकांत शिंदे त्याचबरोबर आमदार आणि सत्ताधारी पक्षावर हल्लाबोल करत भाजपच्या केंद्रीय धोरणांवर देखील टीका केली. वाढत्या महागाईचा सर्वाधिक फटका महिलांना बसत असून आता महिलांची एकजूट महत्वाची असल्याचे ज्योतीताई ठाकरे यावेळी म्हणाल्या.दिवा शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठीशी








महिला मोठ्या संख्येने उभ्या असल्याचे त्या यावेळी म्हणाल्या.ज्योतीताई पाटील या महिलांमध्ये उत्तम काम करत असून महिला संघटित करण्याचे काम त्या करत असल्याचे ज्योतीताई ठाकरे यावेळी म्हणाल्या.यावेळी शिवसेना प्रवक्ते अनिश गाढवे,खासदार राजन विचारे यांच्या सौभाग्यवती माजी नगरसेविका नंदिनी राजन विचारे यांचीही भाषणे झाली.कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून कल्याण जिल्हा प्रमुख सदानंद थरवळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला हजारो महिला उपस्थित होत्या... विधानसभा दिवा शहर संघटिका योगिता नाईक,शहर प्रमुख सचिन पाटील,शहर संघटक रोहिदास मुंडे, उप शहर संघटक प्रवीण उतेकर, उपशहर संघटिका प्रियंका सावंत,उपशहर प्रमुख तेजस पोरजी, विभाग प्रमुख चेतन पाटील संजय जाधव रवी रसाळ मचिंद्र लाड,शनिदास पाटील,हेमंत नाईक, उप विभागप्रमुख योगेश निकम,सतीश मांडरेकर,शाखा प्रमुख अनिकेत सावंत,मूर्ती मुंडे,शशिकांत कदम,स्मिता जाधव, संभाजी जाधव,रोहिदास रतन मुंडे,अनिल पवार,संजय अरदलकर,सुशील रसाळ,सुहासिनी गुळेकर,उषा साळुंके, साधना सिंग,पूनम पाटणकर,जानवी जावडेकर,नीता पाटील,श्रुती पवार, शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते तन्वी फाउंडेशन सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669




# दिवा मनसेकडून शाळा व महाविद्यालयांना राज्य गीताची प्रतिमा भेट

## अनोख्या उपक्रमासह मनसे कडून मराठी भाषा दिवस उत्साहात साजरा




**दिवा:**-दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दिवा मनसे कडून मराठी भाषा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. २७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा जन्मदिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो.

दिवा मनसेचे शहराध्यक्ष तुषार पाटील यांच्या संकल्पनेतून यावेळी दिव्यातील विविध शाळा आणि महाविद्यालयांना राज्यगीताची प्रतिमा भेट म्हणून देण्याचा अनोखा उपक्रम यावेळी राबविण्यात आला. सर्व शाळांमध्ये जाऊन मनसे पदाधिकाऱ्यांनी राज्यगीताची प्रतिमा शाळांना भेट म्हणून दिल्या. सोबतच दिवा रेल्वे स्थानक परिसरात मी मराठी,माझी स्वाक्षरी मराठी या मोहिमे अंतर्गत मराठी स्वाक्षरी मोहीम दिवा मनसे कडून राबविण्यात आली, ज्याला दिव्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




# मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात होणार राहुल गांधींची सभा

**ठाणे:** 'भारत जोडो' न्याय यात्रा महाराष्ट्रात दाखल झाल्यानंतर राहुल गांधींची यात्रेची वाहनांवरून सभा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे या बालेकिल्ल्यात होणार आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर जर आचारसंहिता लागल्यास महाविकास आघाडीच्या वतीने राहुल गांधी प्रचाराचा नारळ वाढविण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाने लक्षकेंद्रित करून मुख्यमंत्री शिंदे यांच्या विरोधात दंड थोपटणार आहे. असे दिसते.

वाडा मार्गे भिवंडी येथून भारत जोडो न्याय यात्रा खारेगाव मार्गे राहुल गांधी हे १६ मार्च रोजी ठाणे शहरात दाखल होणार आहेत. याचदरम्यान मुंब्रा-कौसा, कळवा, कोर्टनाका, जांभळीनाका, राम मारुती रोड, गोखले रोड, तीन हात नाका येथून मुलूंडला जाईल. जांभळी नाका येथे राहुल गांधी हे यात्रेच्या वाहनांवरूनच सभा घेऊन उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. तर, १७ मार्चला दादर चैत्यभूमी येथे यात्रेचा समारोप होईल. याचदिवशी ते मुंबईतील महाविकास आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी नुकतीच ठाणे काँग्रेस मुख्यालयात बैठक घेऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना महत्वाच्या सुचना केल्या. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधून यात्रेबाबत माहिती दिली. यावेळी ठाणे जिल्हा अध्यक्ष विक्रांत चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.


## वृत्तपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज

**फॉर्म-४**
(नियम ८ अन्वये)

१) **प्रकाशन स्थळ :**
**पत्ता :** श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-४०० ६१२.

२) **प्रकाशनाचे कालमान :** साप्ताहिक

३) **मुद्रकाचे नाव :** सुहास शांताराम खंडागळे
राष्ट्रीयत्व : भारतीय
**पत्ता :** श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-४०० ६१२.

४) **प्रकाशकाचे नाव :** सुहास शांताराम खंडागळे
राष्ट्रीयत्व : भारतीय
**पत्ता :** श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-४०० ६१२.

५) **संपादकाचे नाव :** सुहास शांताराम खंडागळे
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-४०० ६१२.

६) **वृत्तपत्राचे मालक असणाऱ्या व्यक्तीचे नाव :** सुहास शांताराम खंडागळे
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-४०० ६१२.

मी, **सुहास शांताराम खंडागळे** या अन्वये जाहीर करतो की, वरील दिलेली सर्व माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.
तारीख : ०४/०३/२०२४

प्रकाशकाची सही
**सुहास शांताराम खंडागळे**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. ४ मार्च २०२४
पान : ४

# बेतवडे येथील बंद स्थितीत असणाऱ्या पाण्याच्या टाक्यांना दिव्यातील पाणीटंचाईचे स्मारक घोषित करा



## ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांचा पालिका प्रशासनावर हल्लाबोल

**दिवा:- दिवा शहरात एकीकडे पाणी टंचाई असताना दुसरीकडे शहराला पाणीपुरवठा होण्यासाठी बांधण्यात आलेल्या बेतवडे येथील दोन पाण्याच्या टाक्या मागील दहा ते बारा वर्षापासून बंद स्थितीत असल्याने या दोन्ही पाण्याच्या टाक्यांना दिव्यातील पाणीटंचाईचे स्मारक घोषित करा आणि या बंद टाक्यांची गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करा अशी खरम रीत टीका ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर संघटिका ज्योती पाटील यांनी केली आहे.**

दिवा शहरात पाणीपुरवठा होण्यासाठी बेतवडे येथे साठवण टाक्या दहा ते बारा वर्षांपूर्वी बांधण्यात आल्या, मात्र या दोन्ही टाक्या बांधल्यानंतर त्या बंद स्थितीत असून त्यातून शहराला पाणीपुरवठा होत नाही. दिवा शहरात पाणीपुरवठा होण्यासाठी साठवण टाक्याच उपलब्ध नसल्याने संपूर्ण शहराला समान दाबाने पाणीपुरवठा होत नाही. याला पालिका प्रशासनाचे नियोजन आणि तत्कालीन सत्ताधारी जबाबदार असल्याचे मत ज्योती पाटील यांनी व्यक्त केले आहे. जर या दोन टाक्यांमधून पाणीपुरवठा करायचा नव्हता तर या टाक्या बांधल्या कशासाठी? असा सवाल ही ज्योती पाटील यांनी केला आहे. या बंद स्थितीत असणाऱ्या दोन पाण्याच्या टाक्या सुरू झाल्यास त्यातून किमान दिवा शहरातील काही भागाला मुबलक स्वरूपात समान दाबाने पाणीपुरवठा होऊ शकला असता असेही ज्योती पाटील यांनी म्हटले आहे. अस्तित्वात असणाऱ्या पाण्याच्या टाक्या बंद ठेवणे हे कोणते शहाणपण असा सवाल ही ज्योती पाटील यांनी केला आहे. या टाक्यांवर करण्यात आलेला खर्च संबंधित ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावा अशी मागणीच ज्योती पाटील यांनी केली आहे.दिवा शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी टाक्या एकीकडे दहा ते बारा वर्षांपासून बंद असताना दुसरीकडे या टाक्यांवर पाण्यात मासे पोहत असल्याची रंगरंगोटी करण्यात आली आहे, हे हास्यास्पद असल्याचे ज्योती पाटील यांनी म्हटले आहे. दिव्यात भीषण पाणी टंचाई आहे.टँकर दिव्याच्या प्रत्येक भागात पाहायला मिळतात. नागरिकांना पाण्यासाठी वन वन भटकावे लागते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन दिवा शहरात असणाऱ्या भीषण पाणीटंचाईचे स्मारक म्हणून या दोन्ही बंद टाक्यांना घोषित करावे व या दोन्ही बंद टाक्यांची गिनीज रेकॉर्ड बुक मध्ये नोंद करण्यात यावी अशी उपरोधक मागणी ठाकरेंच्या शिवसेनेच्या ज्योती पाटील यांनी केली आहे.

## दहावीच्या विद्यार्थ्यांना औक्षणाद्वारे मिळाले आशिर्वाद

*दिवा – बारावी, दहावीच्या परिक्षाम्हणजे विद्यार्थ्यांना परिक्षेचा भयंकर ताण येतो. हाच ताण कमी होऊन त्यांना आपली हिंदू संस्कृती समजण्यासाठी अखिल ट्युटोरिअलच्या अखिलेश सिंह सरांकडून दिद्यार्थ्यांचेऔक्षण करुन आशिर्वाददेण्यात आला.*

*आता सर्वजण नवनविन गोष्टी शिकत असताना जुन्या गोष्टी, जुने संस्कार आपण विसरत चाललो आहोत. पूर्वी परिक्षेला जाताना मुलांना औक्षण केले जायचे नंतर हातावर खाण्यासाठी दही दिले जायचे. हे संस्कार मागे पडत गेल्याने म ुलांना त्याचे महत्व माहिती नाही. पण हे संस्कारअखिलेश रामनरेश सिंह यांनीगेल्या आठ ते दहा वर्षांपासून त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवले आहेत. त्यामुळे त्याचे चांगले परिणाम ही विद्यार्थ्यांमध्ये त्यांना दिसत आहेत. दिव्यातील ह्या एकमेव अखिल ट्युटोरिअल क्लासमध्ये बारावी, दहावीच्या मुलांचे विद्येची देवता असणाऱ्या सरस्वती देवीच्या समोर आज अखिलेश सिंह सरांकडून औक्षण केले गेले. त्यावेळी विद्यार्थ्यांना ही आमच्या आयुष्यात पहिल्यांदा आम्हाला औक्षण केल्याने बरे वाटले. या औक्षणामुळे आम्हाला आशिर्वाद मिळाल्याने नक्कीचआम्ही चांगले मार्क परिक्षेत काढू, अशा भावना विद्यार्थ्यांनीव्यक्तकेल्या.*




# दिवा भाजप महिला मोर्चाच्या वतीने शिबिराचे आयोजन

## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दिवा:**–भारतीय जनता पार्टी दिवा शहर महिला मोर्चाच्या वतीने नागरिकांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महिला मोर्चाच्या अध्यक्षा सपना रोशन भगत यांच्या वतीने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.यावेळी दिवा शहरातील अवधूत हॉल येथे रेशन कार्ड, आधार कार्ड, आयुष्यमान कार्डचे वाटप करण्यात आले. रेशनिंग कार्ड धारकांसाठी नवीन रेशनिंग कार्ड बनवणे, नाव कमी करणे किंवा वाढवणे, आधार कार्डला लिंक करणे,व आधार कार्ड साठी नवीन आधार कार्ड नोंदणी,बायोमेट्रिक कार्ड, पत्ता बदल, नावात बदल व आधार कार्ड अपडेट करण्यात आले.











या शिबिरात दिव्यातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला.

यावेळी ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले , जिल्हा सरचिटणीस सचिन पाटील , कल्याण जिल्हा सरचिटणीस नंदू दादा परब, कल्याण ग्रामीण विधानसभा विस्तारक धनाजी पाटील, नरेश पवार ,विजय भोईर, अशोक पाटील , गणेश भगत , रेश्मा पवार , दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर , दिलीप भोईर, समीर चव्हाण , अंकुश म ढवी , सतिश केलशिकर , जयदीप भोईर , श्रीधर पाटील , धर्मेंद्र शेलार ,अजयसिंह ,जिलाजीत तिवारी ,युवराज यादव , गौरीशंकर पटवा,निशा पवार , रंजना माने ,साक्षी गवाणकर , पूनम तिवारी , यांच्यासह पदाधिकारी व महिला, कार्यकर्ते उपस्थित होते.

# रिलायबल चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मेगा ब्रेस्ट कॅन्सर स्क्रीनिंगचे आयोजन

## २०० हून अधिक विनामूल्य चाचण्या

**मुंब्रा (युसूफ पुरी) :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रिलायबल चॅरिटेबल ट्रस्ट, कॅन्सर पेशंट एड असोसिएशन आणि बुरहानी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद कोळीवाडा येथील बुरहाणी हॉस्पिटल येथे मोफत कॅन्सर तपासणी मेगा शिबिराचे आयोजन सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत करण्यात आले होते.

या मध्ये ईएनटी, ओवेरी (अंडाशय), एचपीपी, रक्त इत्यादी तपासण्यात आले. शिबिरात २०० हून अधिक महिलांची तपासणी करण्यात आली.प्रमुख पाहुणे म्हणून मुंब्रा दाऊदी बोहरा समाजाचे शेख गुलाम अब्बासभाई इंदौरवाला, ट्रस्टचे प्रमुख सैफ ुद्दीन भाई जानी, जुझार एस चुलावाला, स्थानिक माजी नगरसेवक राजन कीणे, माजी नगरसेवक अनिता कीणे, बळीराम टकले, मोरेश्वर कीणे, करण कीणे, मुबीन सुर्वे, जूज़र सोनी आदी उपस्थित होते. शिबिरात महिला स्तन तज्ज्ञ डॉ.नीता मोरे यांनी सांगितले की, स्तनासंबंधी काही समस्या असल्यास उपचारापूर्वी त्याची तपासणी करून घ्यावी. कर्करोग हा आता असाध्य नाही, तो काळाच्या ओघात नष्ट होऊ शकतो, दरवर्षी कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे, पण त्या अनुषंगाने तपास आणि उपचाराच्या आधुनिक सुविधाही वाढल्या आहेत, असे सांगितले. वाढीव चाचणीमुळे, रोग लवकर पकडला जातो आणि उपचाराने, रुग्ण पूर्णपणे बरा होतो. डॉ. मोरे म्हणाले की, कर्करोगा बाबत सम ाजात भीतीचे वातावरण पसरले आहे, महिलांमध्ये भीती निर्माण झाली आहे किंवा विविध कारणांम ुळे महिला आपल्या समस्या कोणाला सांगत नाहीत, हा आजार आता असाध्य राहिलेला नाही.

या शिबिराचा उद्देश लोकांमध्ये जागरुकता निम ाण करण्यासोबतच रोगाचा लवकर शोध घेणे हा असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी शिबिराच्या प्रमुख पाहुण्या अनिता कीणे म्हणाल्या की, म हिलांवर घरातील कामाची अधिक जबाबदारी असते, त्यामुळे त्यांना वेळेत उपचाराचा विचार करता येत नाही, आपण आपल्या आरोग्या बाबत जागरुक राहण्याची गरज आहे, अशा शिबिरांच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या आरोग्या बाबत जागरुक राहण्यासाठी वेळ मिळतो. माजी नगरसेवक राजन केणे यांनी या शिबिराचे कौतुक करून परिसरात अशा कार्यक्रमाची गरज असल्याचे सांगितले.बुरहानी हॉस्पिटलचे सदस्य म ुस्तुफा संचावाला म्हणाले की, आमच्या हॉस्पिटल मध्ये असे शिबिर होत आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे.नीता मोरे जसे डॉक्टर हे असे व्यक्तिमत्व आहे ज्यांनी कॅन्सरला हरवण्यासाठी शेकडो मोहिमा राबवल्या त्याच प्रमाणे या उपक्रमात आपणही त्यांच्या सोबत आहोत, अगदी क्षुल्लक उद्दिष्ट गाठले तरी चाचण्या करून घ्याव्यात असे आवाहन त्यांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी रुग्णालय व ट्रस्टचे सदस्यां व्यतिरिक्त मुर्तुजा पिसोरी, मुस्तुफा संचावाला, पुष्पिंदर कौर, अमरीन खान, जोहरभाई आदींनी आपले अनमोल योगदान दिले.

# नामांकित सौंदर्य स्पर्धा मिस नवी मुंबईच्या तेराव्या पर्वासाठी चौदा सौंदर्यवती सज्ज



## आंतराष्ट्रीय महिला दिनी होणार 'मिस नवी मुंबई' सौंदर्यस्पर्धेची अंतिम फेरी

**नवी मुंबई:** सर्वात प्रतिष्ठित सौंदर्य स्पर्धांपैकी जी मानली जाते ती अर्थातच मिस नवी मुंबई आपल्या तेराव्या पर्वात पदार्पण करीत आहे. यू अँड आय एंटरटेनमेंट ने तेरा वर्षांपूर्वी एक स्वप्न बघितले होते की जागतिक दर्जाची सौंदर्य स्पर्धा आपल्या नवी मुंबई मध्ये आयोजित करावी. अथक परिश्रमानंतर ही स्पर्धा सर्वोत्कृष्ट व सर्वात प्रतिष्ठित बनली आहे.या स्पर्धेच्या माध्यमातून फॅशन क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या सुमन राव, दिव्या अग्रवाल,अक्षता सोनवणे, कविता मिश्रा या सौंदर्यवतींनी देश व जागतिक पातळीवर आपला ठसा उमटविला आहे.



''आंतरराष्ट्रीयस्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करणे व जागतिक सौंदर्य स्पर्धा जिंकणे सोपे नाही. प्रथम फेरीत शेकडो सहभागी स्पर्धकांमधून सर्वोत्कृष्ट सौंदर्यवतीं निवडणे खूप कठीण आहे. निवडलेल्या सौंदर्यवतींना यू अँड आय टिम च्या वतीने उत्तमरित्या प्रशिक्षित केले जाते.''

यू अँड आय एंटरटेनमेंट चे हरमीत सिंग यांनी सांगितले. ''तरुण मुलींमधील गुणविशेष ओळखून ते तेवढ्यापुरतं मर्यादित न ठेवता त्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांना रंगमंचावर आणण्यासाठी आम्ही वर्षानुवर्षे कठोर परिश्रम घेत आहोत. आणि या प्रतिभावान मुलींना योग्य असे व्यासपीठ देऊ शकलो याचा आम्हाला आनंद आहे.

यू अँड आय एन्टरटेनमेंट चे डायरेक्टर मनमीत सिंग यांनी पत्रकारांना सांगितले.

''नवी मुंबईत सौंदर्यवती होण्याची इच्छा असणाऱ्या मुलींसाठी अशी कोणतीही संधी उपलब्ध नसताना आम्ही त्यांना व्यासपीठ देण्यास सुरुवात केली. नवी मुंबई च रूपांतर एका ग्लॅमर शहरात करण्याच्या उद्देशाने आम्ही सौंदर्यवतींच्या कलागुणांना वर्षानुवर्षे अशी अप्रतिम संधी देऊ शकलो आणि देत राहू याचा आम्हाला आनंद आहे!'' श्री सुरिंदर सिंग - यू अँड आय एंटरटेनमेंट चे अध्यक्ष यांनी नमूद केले.

व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शक आणि मानसशास्त्रज्ञ इंद्रप्रीत कौर या सांगतात कि ''मी वैयक्तिकरित्या या सौंदर्यवतीं मध्ये वर्षानुवर्षे झालेले परिवर्तन पाहिले आहे आणि एकत्रितरित्या हि स्पर्धा आयोजित केल्याचा आम्हाला अभिमान वाटतो''

''मिस नवी मुंबई आणि यू अँड आय सोबत आमचा बरेच वर्ष संबंध आहे. या स्पर्धेने शहराला जो नाव लौकिक मिळून दिला आहे, त्यामुळे आम्ही मंत्रमुग्ध झालो आहोत आणि या प्रतिष्ठित स्पर्धेशी आम्ही संबंधित आहोत याचा आनंद वाटतो.'' असे फोर पॉईंट नवी मुंबई चे महाव्यवस्थापक, स्टीफन डिसूझा यांनी सांगितले.

''गेल्या अनेक वर्षांपासून मिस नवी मुंबई सोबत माझं एक नातं निर्माण झालं आहे. या स्पर्धेमध्ये मिळणार आनंद व नवनवीन गोष्टीचे ज्ञान हे प्रत्येक वेळी काही तरी नवीन शिकवून जाते. '' असे रनवे डायरेक्टर आणि रॅम्प वॉक ट्रेनर स्मृती बथिजा हिने सांगितले. स्मृती ने मिस इंडिया इंटरनॅशनल २०१९-२०२० किताब जिंकला आहे.

मिस नवी मुंबई २०२४ ची पत्रकार परिषद फोर पॉइंट्स वाशी येथे आयोजित करण्यात आली होती. अंतिम फेरीत दाखल झालेल्या सौंदर्यवतींनी उपस्थितांची मने जिंकलीत यावेळी फोर पॉईंट नवी मुंबई चे किरण मुनीराज,, अभिजित अदूरकर, रिया मेक्कट्टुकुलम, मिस महाराष्ट्र गौरी गोठणकर ,डॉ संजीव कुमार,अशोक मेहरा,सौम्या सिंग व इतर मान्यवर उपस्थित होते.

अंतिम फेरी मध्ये दाखल झालेल्या सौंदर्यवतीं श्रद्धा चौधरी,गीताश्री डेका, हर्षिखा रावत, भावना अजवानी, स्नेहा धाकटे, श्रिया नंदिनी,सपना देवडा, सुकन्या कंदारकर, कनक अग्निहोत्री, कुमुद कुमार, अनुष्का सिंह, मयुरी मिश्रा,हिमांशी छल्लानी,तमन्ना भरत किताब जिंकण्यासाठी सज्ज आहे.

रॅम्प वॉकचे प्रशिक्षण अभिनेत्री आणि मॉडेल सिमृती बथिजा- रनवे कोरिओग्राफी आणि पेजेंट ग्रूमिंग एक्सपर्ट- मिस इंडिया इंटरनॅशनल २०१९ द्वारे केले जाईल.तसेच व्यक्तिमत्व विकास, सॉफ्ट स्किल्स ट्रेनिंग आणि मेंटल वेलनेस मेंटॉरिंग हे मानसशास्त्रज्ञ आणि व्यक्तिमत्व विकास मेंटॉर - इंद्रप्रीत कौर गुप्ता यांच्याद्वारे दिले जातील. जेणे करून त्यांच्यातील व्यक्तीमत्वाला चालना मिळेल व अंतिम फेरीत स्वत:ला त्या सिद्ध करतील. या स्पर्धेची अंतिम फेरी आंतराष्ट्रीय महिला दिनी शुक्रवार दिनांक ८ मार्च २०२४ रोजी वाशीच्या फॉर फोईन्ट्स मध्ये संपन्न होईल.

# ठाणे-मुलुंड मधील नव्या संकल्पित रेल्वे स्थानकाला 'श्रीस्थानक' नाव द्या - विनय सहस्रबुद्धे

**ठाणे :** ठाणे आणि मुलुंड यांच्या दरम्यान निर्माण होऊ घातलेल्या नव्या रेल्वे स्थानकाला ठाण्याचे प्राचीनकाळातील मूळ नाव 'श्रीस्थानक' हेच दिले जावे आणि देशातील पहिले रेल्वे स्टेशन या नात्याने ठाणे रेल्वे स्थानकाचे महत्त्व लक्षात घेऊन ठाणे रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाच्या आराखड्यात ठाण्याच्या संस्कृतीचे प्रभावी दर्शन घडविले जावे अशा महत्त्वाच्या मागण्या माजी खासदार विनय सहस्रबुद्धे यांनी केल्या आहेत. त्यांच्या आग्रहावरून मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक रजनीश गोयल यांनी आज ठाणे स्थानकाला समक्ष भेट देऊन प्रवाशी सोयी-सुविधांचा विस्तृत आढावा घेतला त्यावेळी सहस्रबुद्धे यांनी इतर अनेक मागण्यांबरोबरच या महत्वाच्या मागण्या ही केल्या. नवीन रेल्वे स्थानकाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावे. ठाणे रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास, कल्याण-वाशी, ठाणे

## मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक रजनीश गोयल यांची विनय सहस्रबुद्धे व भाजपा शिष्टमंडळासोबत आढावा बैठक

ते वाशीमार्गे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि ठाणे -वसई या लोकल सेवा सुरु कराव्यात, कोकणात जाणाऱ्या सर्व गाड्यांना अतिरिक्त बिना आरक्षित डबा जोडण्यात यावा, अधिकाधिक मेल-एक्सप्रेस गाड्यांना जाता-येता ठाणे येथे थांबा द्यावा, तसेच प्रत्येक फलाटावर सरकते जिने, स्थानकातील पूर्व-पश्चिम पुलांना जोडणारे उत्तर-दक्षिण पूल निर्माण करणे आणि स्वच्छतागृहांसकट सर्व सुविधा असलेल्या विश्रामगृहांची रचना आणि नियमती देखभाल इत्यादी महत्त्वाच्या मागण्या विनय सहस्रबुद्धे यांच्या नेतृत्वाखालील भाजपा शिष्ट-मंडळाने केल्या.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रवासी संघटनेचे मिलिंद बल्लाळ तसेच नंदकुमार देशमुख , प्रदेश प्रवक्ते सुजय पतकी, सरचिटणीस विलास साठे, स्थानिक नगरसेवक भरत चव्हाण, मृणाल पेंडसे, सुनेश जोशी, प्रतिभा मढवी, नम्राता कोळी इत्यादींसह नीलेश कोळी, श्रुतिका मोरेकर, अमरीश ठाणेकर तसेच अन्य अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ४ मार्च २०२४
पान : ७
www.diwanews.com

## मुख्यमंत्र्यांची बनावट सही, शिक्का वापरल्याची बाब गंभीर

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बनावट सही आणि बनावट शिक्का असलेली काही निवेदने समोर आली असून त्याची राज्य शासनाने गंभीरतेने दखल घेतली आहे. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास सुरु आहे. याप्रकरणात कोणालाही पाठिशी घातले जाणार नाही. दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

# ठामपा कर्मचारी आणि पोलिसांची अधिवेशनात मांडली बाजू



## निवृत्तीचे वय ६० करा –आ.संजय केळकर

**ठाणे:** अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार संजय केळकर यांनी पुन्हा एकदा पोलिसांचे निवृत्तीचे वय ६० वर्षांपर्यंत वाढवण्याची मागणी केली तसेच ठाणे महापालिकेतील १८३० कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा आग्रह धरला.

राज्य आणि केंद्र सरकारने गरीब कल्याणासाठी सुरू केलेल्या योजना मांडून सरकारचे अभिनंदन करताना आमदार संजय केळकर यांनी विरोधकांच्या टीकेला जोरदार उत्तर दिले. यावेळी त्यांनी पोलीस, ठामपा कर्मचारी, आंबा उत्पादक शेतकरी, सफाई कर्मचारी अशा विविध घटकांची बाजू जोरदारपणे मांडली.

राज्य सरकारने पोलीस वसाहतींसाठी जास्तीत जास्त निधी दिला असल्याचे सांगून श्री.केळकर यांनी आभार मानले. देशातील २० राज्यांमध्ये पोलिसांचे निवृत्तीचे वय ६० ते ६२ वर्षांपर्यंत असल्याची माहिती दिली. राज्यातही हे वय ६०पर्यंत नेण्याची मागणी त्यांनी केली. यामुळे पोलीस दलाला सक्षम अधिकारी कर्मचारी उपलब्ध होतील, असे मत श्री.केळकर यांनी मांडले.

ठाणे महापालिकेत २०१६ नंतर १८३० कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. ही कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश द्यावेत. अनुकंपा तत्वावरील आणि वारसा हक्काची नोकर भरतीही रखडली असून ती तातडीने सुरू करावी. याचा लाभ सफाई कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

ठाण्यात तरुणांना उद्ध्वस्त करणाऱ्या हुक्का पार्लर संस्कृती विरोधात ठाण्यात पोलिसांच्या सहकार्याने चळवळ उभी केली. त्यावर कारवाईही करण्यात आली, पण बेकायदेशीर खेळ आणि जुगाराची दुकाने बंद करण्याची गरजही श्री.केळकर यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शेतकरी सन्मान योजना सुरु करण्यात आली असून प्रत्येकाच्या खात्यात १२ हजार रुपये जमा होत आहेत. अर्थसंकल्पातही शेतकऱ्यांसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. अशावेळी कंबरडे मिळालेल्या आंबा उत्पादक शेतकऱ्यांनाही अनुदान देऊन दिलासा देण्याची गरज असल्याचे मतकेळकर यांनी व्यक्त केले.

**राज्य आणि केंद्राचे आभार**

केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकरी आणि गरीब घटकांसाठी अनेक योजना राबवण्यात आल्या आहेत. देशातील ५० कोटी लोकांची जन धन खाती उघडण्यात आली आहेत. ५० कोटी लोकांना आयुष्मान योजनेंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंत वैद्यकीय खर्च उचलणारे कार्ड वितरित करण्यात आले आहेत. गरीब कल्याण योजनेमुळे २५ टक्के कुटुंबे गरिबी रेषेच्या वर आली आहेत तर ८० कोटी लोकांना मोफत धान्य मिळत आहे. हे सरकार सर्वसाम ान्य जनतेचे सरकार आहे. गेल्या ५० वर्षांत झाले नाही ते जनहिताचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात झाल्याचे सांगून आमदार संजय केळकर यांनी आभार मानले.

# सर्वंकष स्वच्छता मोहिमेस ठाण्यातील लोकमान्यनगर प्रभागसमिती कार्यक्षेत्रात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





**ठाणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेनुसार ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती क्षेत्रात साफसफाई करण्यात आली. लोकमान्य सावरकर प्रभागसमितीमधील मा. मुख्यमंत्री निवासस्थान, नितिन कंपनी सर्कल येथून या सफाई मोहिमेस प्रारंभ झाला. या मोहिमेत मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, पदपथ, नाले यांची सफाई करण्यात आली.

या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत सफाई कर्मचाऱ्यांसमवेत आयुक्त अभिजीत बांगर, माजी नगरसेवक एकनाथ कणसे, शरद कणसे, अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे तसेच महापालिकेचे सर्व उपायुक्त, विभागप्रमुख सहभागी झाले होते.

महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत रस्ते दुभाजक स्क्रबरने घासून पाण्याने स्वच्छ करणे, पदपथ सफाई, नाले सफाई, उद्यानांची सफाई करण्यात आली. लोकमान्यनगर सावरकरनगर मधील स्थानिक नागरिकांचा या मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लोकमान्य सावरकरनगर मधील नितिन कंपनी सर्कल, काजूवाडी साईबाबा सर्कल परिसरातील सिध्दीविनायक चौक ते मैत्री टॉवर, साईनाथ नगर, संतोषी माता चौक, एलआयसी ते साती आसरा संकल्प चौक, जव्हार ज्योत हाजुरी परिसरातील सबेरा हॉटेल, पासपोर्ट ऑफिस, रोड नं. १०, एम.आय.डी. सी, पासपोर्ट ऑफिस ते रोड नं. १०, नितिन कंपनी सर्कल व वैतीवाडी परिसरातील कोरम मॉल, प्रगती हॉस्पीटल, वैतीवाडी गल्ली नं. २ ते दत्तमंदिर, ज्ञानेश्वर नगर, आईमाता चौक परिसरातील आईमाता सर्कल ते ठाकूर कॉलेज, पाटीलवाडी परिसर, सावरकरनगर परिसरातील मराठा हॉटेल नाला, लोकमान्यनगर टीएमटी डेपो परिसर, सिद्धिविनायक चौक, इंदिरानगर, लोकमान्य टिळक चौक ते वरचा म्हाडा परिसर, वर्तकनगर नाका परिसरातील वर्तकनगर नाका ते देवदया सर्कल, आकृती हब टाऊन रोड, लक्ष्मी पार्क सर्कल येथे शास्त्रीनगर ते हत्ती पुल, कोरस हॉस्पिटल परिसर, लोकमान्य मार्केट, इंदिरानगर नाका, लोकमान्यनगर परिसरात साफसफाई करण्यात आली. तसेच मराठा चौक परिसरातील मराठा हॉटेल ते इंदिरानगर नाका, दालमिल नाका परिसर, जयभवानी शिवसेना शाखा ते रोड नं. ३३, दालमिल नाका ते एम्को कंपनी, स्मशानभूमी रेड स्पॉट, तीन हात नाका सर्कल, तानसा पाईपलाईन रोड, पाईप लाईन, दोस्ती रेंटल परिसर, आकृती रेंटल परिसर तसेच दत्तमंदिर नाला ते लाकडी ब्रीज, माताजी मेडिकल मागे लाकडी पूल मार्केट या नाल्यांचीही या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत साफसफाई करण्यात आली.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ४ मार्च २०२४
पान : ८
www.diwanews.com

# आर्यमाने इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न





**दिवा:– मराठी राज्यभाषा दिनाच्या निमित्ताने आर्यमाने इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा काल दिवा साबा येथील विठ्ठल मंदिराच्या आवारातील सभागृह साजरा झाला. कळवा, मनीषा नगर आणि दिवा येथील तिन शाळेच्या विद्यार्थ्यांचा हा एकत्र सोहळा पार पडला.**

सदर कार्यक्रमास स्थानिक समाजसेविका अर्चना पाटील, नगरसेवक अमर पाटील, ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे, शाळेच्या संस्थापिका प्रगती आर्यमाने उपाध्यक्ष प्रकाश जोशी संचालक संजय आर्यम ने मुख्याध्यापक धनराज आर्यमाने स्थानिक नगरसेवक यांच्यासह ज्युनिअर के.जी सिनियर के.जी आणि पहिली ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थी यांच्या सह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरस्वतीला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची सुर्वात गणेश वंदनेने झाली.शाळेच्या चिमुकल्या मुला मुलींच्या नृत्य गायनाने उपस्थित पालक वर्ग अवाक झाले. शाळेतल्या सर्व शिक्षकांनी या लहान मुलांकडून नाच गाण्याची सुंदर प्रॅक्टिस केल्याचे दिसुन आले. छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका केलेल्या मुलाने राष्ट्रीय एकात्मतेचा जाती धर्माचा संदेश दिला.एका मुलीने कीर्तनाच्या माध्यमातून बाराखडीचा अनोखा अर्थ समजाऊन सांगितला तर ज्युनिअर के.जी सिनियर के.जी.ते पाचवी पर्यंतच्या मुलांनी गणेशनृत्य, देविचा जागर ,कोळी नृत्य,भांगडा,गरबा, साऊथ इंडियन डान्स करून उपस्थित पालकांची मने जिंकली. शाळेच्या डान्स टीचर ने बाबां व मुलाच्या प्रेमाचे नृत्य सादर केले. कळवा शाळेच्या महिला पालकाने एक सुंदर नृत्य सदर केले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थांना खाऊचे वाटप करण्यात आले.














